## भाग 'अ'

## (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i) )

| | |
|---|---|
| MHBI150001822024 | **पाटोदा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**<br>[एम. ए. शिंदे, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचेसमोर]<br>[जाहीर दिनांक ०७/०५/२०२६]<br>**निशाणी क्र.१० सोबत** |
| खटला क्रमांक :– | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३७/२०२४** |
| गुन्हा रजि. क्रमांक व पोलीस ठाणे :– | **गुन्हा रजि. क्र.३८०/२०२३,**<br>**राज्य उत्पादन शुल्क,विभागीय भरारी पथक,छत्रपतीसंभाजीनगर** |
| फिर्यादी :– | **महाराष्ट्र शासनकरीता**<br>**निरिक्षक,राज्य उत्पादन शुल्क,विभागीय भरारी पथक,छत्रपतीसंभाजीनगर** |
| प्रतिनिधीत्व:– | **सरकारी अभियोक्ता श्री. डी. जी. पौळ** |
| आरोपी:– | **विलास त्रिंबक सानप,**<br>वय – ६० वर्षे, व्यवसाय – शेती,<br>रा. जयसिंगनगर, ता.पाटोदा, जि. बीड. |
| प्रतिनिधीत्व :– | **विधिज्ञ श्री.एन.एस.डोके** |

## – भाग 'ब' –

## (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii) )

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | २९/१२/२०२३ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झालेचा दिनांक | २९/१२/२०२३ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | ०८/०२/२०२४ |
| आरोपीविरुध्द दोषारोप/अपराधाचा तपशील ठेवलेचा दिनांक | ०१/०६/२०२४ |
| पुरावा नोंदविणेस प्रारंभ झालेचा दिनांक | २६/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा आरक्षीत दिनांक | – |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | **०७/०५/२०२६** |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाचा दिनांक | लागू नाही. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर खुले केलेची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा | दिलेल ी शिक्षा | फौप्रसंक ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विलास त्रिंबक सानप | फौ.प्र.सं. कलम ४१–अ नुसार आरोपीस नोटीस दिलेने आरोपीस अटक नाही. | लागू नाही. | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) | निर्दोष मुक्त केले. | लागु नाही | लागु नाही. |

**न्या य नि र्ण य**

**[जाहीर दिनांक ०७/०५/२०२६]**

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये अपराधासाठी खटला चालविण्यात आला आहे.

२. आरोपीवरती अपराधाचा तपशील (नि.१०) निश्चित केला व त्याला समजावून सांगितला. आरोपीने अपराध नाकारुन संपरीक्षा चालविणेची विनंती केली. त्याला

अपराधाच्या खोट्या आरोपामध्ये गोवले असलेचा बचाव घेतला आहे. आरोपीचा अपराध सिध्द करणेसाठी अभियोग पक्षातर्फे **'भाग क'** मध्ये नमूद केलेप्रमाणे कागदोपत्री पुरावे दाखल केले व साक्षीदार तपासले आहेत. आरोपीने विशिष्ट परिस्थिती स्पष्ट करण्याजोगा पुरावा अभिलेखावर न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे आरोपीचे निवेदन घेण्यात आले नाही. विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. डी. जी. पौळ व आरोपी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री एन.एस.डोके यांचा युक्तीवाद ऐकला.

३. अपराधाचे स्वरुप, अभियोग पक्षाने सादर केलेले पुरावे, अभिलेख, दोन्ही बाजूंचा युक्तीवाद पाहता सदर प्रकरणामध्ये खालील मुद्दे निश्चित करुन त्याचे निष्कर्ष कारणामिमांसासहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२९/१२/२०२३ रोजी दुपारी ०५.२० वाजण्याच्या सुमारास मौजे हॉटेल शुभम, चुंबळी फाटा,ता.पाटोदा, जि.बीड येथे आरोपीने त्याच्या ताब्यात बेकायदेशीरपणे, विनापरवाना व अनाधिकाराने देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मि.ली. मापाच्या ८० सीलबंद बाटल्या, मॅकडॉल व्हीस्की नं.१ कंपनीच्या १८०. मि.ली. मापाच्या २० सीलबंद बाटल्या व किंगफीशर बिअर कंपनीच्या ६५० एम.एल. च्या २० सिलबंद बाटल्या असा मुद्देमाल दारु विक्रीच्या उद्देशाने बाळगला व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| २. | काय आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करीताः–**

६. आरोपीचा अपराध शाबीत करणेसाठी तो बेकायदेशीरपणे देशी दारु विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आल्याचे अभियोग पक्षाने शाबीत करणे गरजेचे आहे.

७. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले पंच साक्षीदार श्री.गोपीनाथ (अ.सा.क्र.१) यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, ते आरोपीस ओळखतात. घटना कधी व काय झाली होती हे त्यांना माहिती नाही. त्यांच्या समक्ष पोलिसांनी कोणताही पंचनामा केला नाही व त्यावर त्याची सही घेतली नाही. सदर पंच साक्षीदाराने केवळ पंचनाम्यावरील सही मान्य केली असून पंचनाम्यातील मजकूर नाकारलेला आहे.

८. सरकारी अभियोक्ता यांच्या विनंतीवरुन साक्षीदारास उलटतपासादरम्यान विचारले जाणारे उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली. त्याप्रमाणे साक्षीदारास तपशीलवार विचारणा केली, परंतु आरोपीकडून अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे मुद्देमाल जप्त करुन त्याचे समक्ष पंचनामा केला व त्यावर त्याने सही केली असे देखील घडले नसल्याचे कथन केले आहे. जप्ती पंचनाम्यावरील सदरचा साक्षीदार हे अभियोग पक्षास

सहाय्य करत नाही. जप्ती पंचनाम्यावरील दुसरा पंच यास वारंवार साक्षीसमन्स काढण्यात आले परंतू साक्षीदाराचा समन्स अहवाल दाखल करण्यात आलेला नाही.

९. याशिवाय, आरोपीकडून जप्त केलेला मुद्देमाल ही दारुच होती हे अभियोग पक्षाने शाबीत करणे गरजेचे आहे. अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल केलेला नाही. अभियोग पक्षास पुरेशी संधी देवूनदेखील आरोपीकडून जप्त मुद्देमालाचे नमुने प्रयोगशाळेत पाठविले होते ही बाब शाबीत करण्यासाठी नमुना घेवून गेलेला व्यक्ती किंवा तपासिक अधिकारी, फिर्यादी किंवा इतर पोलिस साक्षीदार यांची साक्ष देखील नोंदविलेली नाही. त्यामुळे सदर नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविले होते याबाबत संशय निर्माण होतो. अभियोग पक्ष हा निसंशयपणे आरोपी विरुध्दचा अपराध शाबीत करु शकलेला नाही. आरोपी हा प्रत्येक नेमली तारखेस न्यायालयात हजर असतो. प्रस्तूतचे प्रकरण हे २ वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता प्रलंबीत आहे. रासायनिक अहवाल प्रस्तूत प्रकरणामध्ये दाखल नाही. अभियोग पक्षास पुरेशी संधी देउन देखील साक्षीदारांची उपस्थीती न्यायालयामध्ये ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे फौ.प्र.सं.कलम २५८ अन्वये प्रस्तुतचा खटला थांबविणे उचित होईल.

१०. अभियोग पक्षास आरोपीचा अपराध निसंशयपणे शाबीत करणेस पूर्णपणे अपयश आले आहे. त्यामुळे आरोपी हा निर्दोषमुक्त करण्यास पात्र आहे. खटल्यामधील जप्त मुद्देमाल हा देशी व विदेशी दारु असल्याने त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. सबब

मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो. तसेच मुद्दा क्रमांक २ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी विलास त्रिंबक सानप याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५ (ई) खालील शिक्षेस पात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५८ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचा जातमुचलका व जामिनकदबा रद्द केले.

**३.** जप्त मुद्देमाल म्हणजेच देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मि.ली. मापाच्या ८० सीलबंद बाटल्या, मॅकडॉल व्हीस्की नं.१ कंपनीच्या १८०. मि.ली. मापाच्या २० सीलबंद बाटल्या व किंगफीशर बिअर कंपनीच्या ६५० एम.एल. च्या २० सिलबंद बाटल्या असा मुद्देमाल अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेसाठी जिल्हाधिकारी, उत्पादन शुल्क यांना पाठविणेचे निर्देश निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभागीय भरारी पथक, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात येतो.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MITHUN ASHOK SHINDE
Date: 2026.05.07 17:50:35 +0530

**ठिकाण – पाटोदा.** **(मिथुन अ. शिंदे)**

**दिनांक –०७/०५/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पाटोदा.**

## भाग 'क'

## (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii) )

## साक्षीदारांची यादी

**अ. सरकारी**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | गोपीनाथ भाउसाहेब सानप | **पंच** | १० लगत |

**ब. बचावाचे साक्षीदार – नाही.**

**क. न्यायालयीन साक्षीदार – नाही.**

## सरकारी / बचाव / न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

**अ. सरकारी – नाही.**

**ब. बचाव– नाही.**

**क. न्यायालयीन निशाण्या– नाही.**

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | -- | देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मि.ली. मापाच्या ८० सीलबंद बाटल्या, मॅकडॉल व्हीस्की नं.१ कंपनीच्या १८०. मि.ली. मापाच्या २० सीलबंद बाटल्या व किंगफीशर बिअर कंपनीच्या ६५० एम.एल. च्या २० सिलबंद बाटल्या **(न्यायालयात हजर केलेला नाही.)** |

Digitally signed by MITHUN ASHOK SHINDE
Date: 2026.05.07 17:50:49 +0530

**ठिकाण – पाटोदा.** **(मिथुन अ. शिंदे)**

**दिनांक –०७/०५/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पाटोदा.**